# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

(सचिवालय)

(नोटीस)

एक कदम स्वच्छता की ओर

(पुरवणी विषय पत्रिका)

नागपूर महानगरपालिकेची सोमवार दिनांक २०/०१/२०२० रोजी सकाळी ११-०० वाजता श्रीमंत राजे रघोजीराव भोसले, नगरभवन, महाल येथे भरणाऱ्या सर्वसाधारण सभेकरिता मा. सदस्यांनी दिलेल्य नोटीसस विचारार्थ व निर्णयास्तव सादर.

नागपूर
दिनांक :- १६/०१/२०२०

आदेशान्वये

हस्ता/-
(राजेश म. मोहिते)
उपायुक्त तथा निगम सचिव
महानगरपालिका, नागपूर

**विषय क्रमांक ५० (नोटीस) :-**
**(समाजकल्याण विभाग)**
**(मा.श्री. प्रवीण प्रभाकरराव दटके)**

नागपूर महानगरपालिका नागपूर, येथे कार्यरत असलेले दिव्यांगाचे प्रश्न (समस्या) शासन दरबारी सोडविण्याच्या दृष्टीकोणातुन नागपूर महानगरपालिकेमध्ये एक दिव्यांग अधिकाऱ्याची नेमणूक करण्याकरिता मनपाच्या सर्वसाधारण सभेत याबाबत चर्चा करुन उचित निर्णय घेण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस.

टिप :- मा. सदस्यांनी सादर केलेली नोटीस नस्तीत उपलब्ध आहे.

**विषय क्रमांक ५१ (नोटीस) :-**
**(नगर रचना विभाग)**
**(मा.श्री. प्रवीण प्रभाकरराव दटके)**

नागपूर सुधार प्रन्यासकडुन नागपूर महानगरपालिकेला कोण कोणते कार्य/योजना हस्तांतरीत करण्यात आल्या आहे. सध्या स्थितीत त्या योजनेची परिस्थिती काय आहे? कोणत्या कार्याची जबाबदारी नागपूर सुधार प्रन्यासकडुन नागपूर मनपाकडे आली आहे. नागपूर सुधार प्रन्यासचे कोण कोणत्या विभागाच्या कार्याची जबाबदारी नागपूर महानगरपालिकेकडे आली आहे. नागपूर सुधार प्रन्यासचे कोण कोणत्या विभागाचे किती कर्मचारी नागपूर महानगरपालिकेत नियुक्त करण्यात आले आहे. या मुद्यावर सभागृहात याबाबत चर्चा करुन उचित निर्णय घेण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस.

टिप :- मा. सदस्यांनी सादर केलेली नोटीस नस्तीत उपलब्ध आहे.

**विषय क्रमांक ५२ (नोटीस) :-**
**(सामान्य प्रशासन विभाग)**
**(मा.श्री. प्रवीण प्रभाकरराव दटके)**

नागपूर महानगरपालिकेच्या आस्थावनेवर किती कर्मचारी कार्यरत आहे व किती कर्मचाऱ्यांनी एम.एस.सी.आय.टी. चे संगणक प्रमाणपत्र सादर करुन वार्षिक वेतन वाढ घेतलेली आहे. अशा कर्मचाऱ्यांची संख्या किती व त्यांच्या वार्षिक वेतन वाढीवर झालेला खर्च किती तसेच नागपूर महानगरपालिकेमध्ये कंत्राटी पध्दीवर (सी.एफ.सी.) कार्यरत असलेले संगणक ऑपरेटरची संख्या किती आहे व त्यांच्या वेतनावर दरमहिन्याला किती खर्च येतो. या मुद्यावर सभागृहात याबाबत चर्चा करुन उचित निर्णय घेण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस.

टिप :- मा. सदस्यांनी सादर केलेली नोटीस नस्तीत उपलब्ध आहे.

**विषय क्रमांक ५३ (नोटीस) :-**
**(सामान्य प्रशासन विभाग)**
**(मा.श्री. प्रवीण प्रभाकरराव दटके)**

अग्निशमन व आणिबाणी सेवा विभागाच्या आस्थावनेवर, १३ स्थानका प्रमाणे अग्निशामक विमोचकांची ५०० पदे मंजूर आहेत. सध्या ९ अग्निशमन केंद्र, आपत्ती व्यवस्थापन कक्ष व अग्निशमन प्रशिक्षण केंद्र त्या प्रमाणे अग्निशामक विमोचकांची पदे त्यापैकी ७० पदे कार्यरत असून, ४३० पदे रिक्त आहेत. म्हणजेच ८६ टक्के पदे रिक्त असल्याने शहरातील मोठया स्वरुपाच्या आगीवर समर्थपणे कार्य करण्यास अडचण येत आहे. मनपाच्या मजूर ठराव क्रमांक १५५ दिनांक ०८-१२-२०१७ राज्य शासनाकडे प्रलंबित आहे.

करीता शासन मान्यतेच्या अटीवर मनपाच्या मंजूर ठराव क्रमांक १५५ दिनांक ०८-१२-२०१७ नुसार सरळसेवा भरतीचे अग्निशामक विमोचकांचे रिक्त असलेल्या पदांची पदभरती करण्याकरिता याबाबत चर्चा करुन उचित निर्णय घेण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस.

टिप :- मा. सदस्यांनी सादर केलेली नोटीस नस्तीत उपलब्ध आहे.

**विषय क्रमांक ५४ (नोटीस) :-**
**(स्थावर विभाग)**
**(मा.श्री. जितेन्द्र भा. घोडेस्वार)**

पटवर्धन ग्राऊंड (सर्कल ग्राऊंड) येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्म शताब्दी वर्षानिमित्त १९९२ रोजी डॉ. बाबासाहेबआंबेडकर स्मारक व शोध केंद्र बनविण्याकरिता मनपा सभागृहाव्दारे याबबाबबत प्रस्स्ताव मंजूर करण्यात आला होता व त्याकरिता मनपा व्दारे निधी सुध्दा उपलब्ध आहे. करीता मनपा प्रशासनाव्दारे प्रशासनिक स्स्तरावरील सर्व मंजुरी घेऊन व त्याबाबतचा प्रस्ताव पारीत करुन महाराष्ट्र शासनाच्या अंतिम मंजुरीकरिता पाठविण्याच्या विचारार्थ व निर्णयास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस.

टिप :- मा. सदस्यांनी सादर केलेली नोटीस नस्तीत उपलब्ध आहे.

**विषय क्रमांक ५५ (नोटीस) :-**
**(आरोग्य विभाग)**
**(मा.श्री. तानाजी वनवे)**

नागपूर महानगरपालिकेने शहरातील कचाऱ्याचे संकलन करुन विल्हेवाट लावण्याकरिता पूर्वी मेसर्स कनक कंपनीकडे कंत्राट दिला होता. परंतु या कंपनीचा कंत्राटाचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर नव्याने निविदा प्रक्रिया पूर्ण करुन निविदेप्रमाणे मेसर्स बी.व्ही.जी. व ए.जी. या कंपन्याची नेमणूक करण्यात आली आहे. कचरा संकलनकरिता कंपनीची नेमणूक करतेवळी पूर्वीच्या कंपनीत काम करणाऱ्या कामगारांना पूर्णत: समाविष्ट करण्यात यावे ही अट देण्यात आली का? तसेच सध्या कार्यस्त असलेल्या कामागारांना देण्यात येणार वेतन व इतर समस्यात अनियमितता आढळत असल्याच्या संदर्भाने,

उपरोक्त नमूद केलेल्या विषयावर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या अंतिम मंजुरीकरिता पाठविण्याच्या विचारार्थ व निर्णयास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस.

टिप :- मा. सदस्यांनी सादर केलेली नोटीस नस्तीत उपलब्ध आहे.

———————